# प्रकरण तीन

## वित्त विभाग

**3.922 खरेदी प्रक्रियेत इ निविदा प्रक्रियेचा वापर करणेबाबत.**

**जिल्हा परिषद सिंधुदुर्ग, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 5) -** जिल्हा परिषद सिंधुदुर्ग कडील विविध योजनांना आवश्यक साहित्य खरेदी मोठया प्रमाणात करावी लागते. सदर खरेदी करताना ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक संकिर्ण-2010/275/प्र.क्र.172/पं.रा-7,दिनांक 19/10/2011 नुसार रुपये 1 लाख व त्यापेक्षा अधिक मुल्य किंमतीची खरेदी e-Tendering प्रक्रियेतूनच करणे आवश्यक आहे. तथापि, सन 2014-15 चे लेखापरीक्षणाचे वेळी काही विभागांनी ई निविदा पध्दतीने खरेदी केल्याचे दिसून येत नाही. उदा. कृषि विभाग, जिल्हा परिषद सिंधुदुर्ग प्लॅस्टिक क्रेट खरेदी प्रमाणक 418,दिनांक 31/03/2015 रक्कम रुपये 29,70,000/-.

उपरोक्त खरेदी बाबत वित्त विभागाने आपले स्पष्ट अभिप्राय संबंधित विभागाच्या नस्तीवर देणे आवश्यक आहे. तसेच अशाप्रकारची खरेदी ई निविदा पध्दतीने होईल याची दक्षता घ्यावी.

**3.923 अखर्चित रोख अनुदानाबाबत.**

**जिल्हा परिषद नाशिक, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 3) -** जिल्हा परिषद, नाशिक ला कर्मचाऱ्यांच्या वेतन व भत्ते तसेच इतर योजनांच्या खर्चासाठी सन 2014-15 मध्ये लेखाशिर्षानिहाय खालीलप्रमाणे रोख अनुदान प्राप्त झालेले आहे. तसेच जिल्हा परिषद नाशिक ने सादर केलेल्या माहे मार्च-2015 अखेरच्या खर्चाच्या विवरणपत्रानुसार अनुदानातून केलेल्या खर्चाच्या तपशिलाबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) अर्थसंकल्पातील तरतुदीनुसार कर्मचाऱ्यांच्या वेतन व भत्ते तसेच योजनांसाठी प्राप्त झालेली तरतुद आहे. मार्च-2015 अखेर खर्च होणार नसल्यास माहे फेब्रुवारी-2015 अखेर शासनास समर्पित करणे आवश्यक आहे. समर्पित अनुदान शासनास दुसऱ्या विभागास देऊन त्याचा खर्च त्याच वर्षात करणे शक्य होऊन विनियोग करता आला असता.

2) सन 2014-15 मध्ये रक्कम रुपये 1,40,88,30,198/- अखर्चित अनुदान शिल्लक असून सदर अनुदानाचा खर्च 2014-15 मध्ये खर्च करणे बंधनकारक आहे. परंतू खर्चाचे विवरणपत्रात सन 2013-14 मधील अखर्चित असल्याबाबत खर्चाचे विवरणपत्रात नमुद नसल्यामुळे सादर केलेले विवरणपत्र सुस्पष्ट दिसून येत नाही.

3) लेखापरीक्षण कालावधीत सन 2014-15 मधील अखर्चित अनुदान शासन सदरी भरणा केलेबाबत दिसून येत नाही. त्यामुळे वेळोवेळी शासन निर्णय व परिपत्रकानुसार जिल्हा परिषदेने कार्यवाही केलेली नाही.

**3.924 शासकीय अनुदानाच्या व जिल्हा परिषद निधीच्या जिल्हा मध्यवर्ती सहकारी बॅकेत गुंतून पडलेल्या करंट व सेव्हींग खात्यावरील रकमेबाबत.**

**जिल्हा परिषद धुळे, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 5) -** जिल्हा मध्यवर्ती सहकारी बॅंकेत शासकीय अनुदानाच्या व जिल्हा परिषद निधीची रक्कम रुपये 37,46,58,510/- शासकीय व्यवहाराशिवाय गुंतून पडलेली आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) जिल्हा मध्यवर्ती सहकारी बॅकेत करंट खाती सगळया रकमा असल्याने या रकमेवर व्याज शासनास मिळालेले नाही.

2) शासकीय अनुदानाच्या अखर्चीत रकमा शासन निर्णय दिनांक 06/06/2008 नुसार दोन वर्षापर्यंत खर्च करण्यास शासनाची मंजूरी आहे. त्या कालावधीपेक्षा जास्त कालावधीतील शिल्लक रकमा शासना परत करणे बंधनकारक आहे.

3) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधीनियम 1961 चे कलम 141 अे व महाराष्ट्र शासन ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक झेडपीए-2009/प्रक्र-522/वित्त-9,दिनांक 10/12/2010

नुसार जिल्हा परिषदेच्या रकमा वसुलीबाबत सुचना देण्यात आलेल्या आहेत. त्या आदेशातील सुचना क्रमांक 6 नुसार वसुलीची कार्यवाही करण्यात आलेली नाही.

4) मुंबई वित्तीय नियम 1959 नियम 57 व महाराष्ट्र कोषागार नियम 1968 नियम 277 नुसार शासकीय अनुदान प्रयोजनाशिवाय बॅकेत ठेवता येत नाही.

**3.925 धुळे व नंदुरबार जिल्हा मध्य्वर्ती सहकारी बँक जिल्हा परिषद नंदुरबार जिल्हा निधीचे खाते बंद करुन ते राष्ट्रीय बँकेत उघडणेबाबत.**

**जिल्हा परिषद नंदुरबार, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 8) -** ग्रामविकास व जलसंधारण विभाग क्रमांक पिका 2012/प्र.क्र.80/वित्त-3,दिनांक 8/08/2012 अन्वये धुळे व नंदुरबार जिल्हा मध्य्वर्ती सहकारी बँकेचे संचालक मंडळ बरखास्त केल्याने व त्यास बँक परवाना नुतनीकरण अद्याप मिळालेले नसल्याने धुळे व नंदुरबार जिल्हा मध्य्वर्ती सहकारी बँकेतील जिल्हा परिषदेची खाती बंद करुन राष्ट्रीयकृत बँकेत उघडण्यास परवानगी देण्यात आलेली आहे. परंतु दिनांक 31/03/2015 अखेर जिल्हा परिषदेमधील रक्कम रुपये 79,12,44,950.96 बँकेत गुंतलेली आहे व त्यात शासनाचे अनुदान रक्कमेचा समावेश आहे. ग्रामविकास व जलसंधारण विभाग, परिपत्रक क्रमांक अआर2013/प्र.क्र.-3/वित्त-2,दिनांक 04/02/2014 अन्वये जिल्हा परिषदेकडील (वेतन व वेतनेतर) अखर्चित निधी शासन खाती भरणा करावी.

**3.926 प्रलंबित अग्रीम धनाबाबत.**

**जिल्हा परिषद जळगांव, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 1) -** दिनांक 31/03/2015 अखेर थकीत अग्रिमाची एकूण रक्कम रुपये 14,16,366/- आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, परिपत्रक क्रमांक म/अ.पु.ले.1092/प्रक्र.1469/30,दिनांक 17/03/1994 मधील 1 ते 5 नुसार कार्यवाही करुन अग्रिम रकमांची 100 टक्के वसुल / समायोजन केलेले नाही. खाते प्रमुखांकडील सन 1963-1964 पासून अग्रिमाची एकुण रक्कम रुपये 1,35,23,836/- व कर्मचाऱ्याकडील धान्य अग्रिम, वेतन/प्रवासभत्ता अग्म, सण अग्रिम रक्कमा सन 1973-1974 पासून एकुण रक्कम रुपये 6,39,825/- ऐवढया मोठया प्रमाणवर प्रलंबित असुन वेळीच वसूल / समायोजन न झाल्याने वर्षानुवर्षे अग्रिम रक्कमा थकित असल्याने जिल्हा परिषदचे व शासनाचे मोठ्या प्रमाणावर नुकसान होण्याची शक्यता नाकारता येत नाही. अग्रिम वसुल करुन पुर्तता दर्शवावी.

**3.927 अभिकरण योजनेंतर्गत कोषागारातून रोखीने आहरीतपैकी अखर्चित रक्कमा तसेच जादा झालेल्या खर्चाबाबत.**

**जिल्हा परिषद अहमदनगर, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 5) -** ग्रामविकास विभाग, परिपत्रक क्रमांक पं.रा.स.1085/प्र.क्र.587/23,दिनांक 03/12/1985 व ग्रामविकास व जलसंधारण विभाग, परिपत्रक क्रमांक पं.रा.स.1570/प्र.क्र.1285/23,दिनांक 09/10/1991 नुसार अखर्चित रक्कमा वित्तीय वर्षाअखेर शासनाकडे सत्वर भरणा करणे आवश्यक असताना अखर्चित रक्कम आणि मागील व चालू अखर्चित रक्कमेस सन 2014-2015 या वित्तीय वर्षात खर्च करण्यास शासनाने दिलेली परवानगी विचारात घेता एकुण अखर्चित रक्कम रुपये 7,65,18,980/- विभागाने शासन खाती भरणा केलेली नाही. कोषागारातून जादा काढण्यात आलेल्या रक्कमांबाबत समर्पक खुलासा करुन आणि अखर्चित रक्कम शासन जमा लेखाशिर्षाखाली भरणा करुन तसे लेखापरिक्षणास अनुपालन दर्शविण्यात यावे.

विवरणपत्र 3 ब (2) मधील स्तंभ क्रमांक 3 मधील नमूद केलेल्या अभिप्रायातील मागील अखर्चित रक्कमांस पूढे खर्च करण्यास शासनाने दिलेली मान्यता व अखर्चित रक्कमा भरणा या संबंधातील लेखे जसे चलने, नोंदवही इत्यादी लेखापरिक्षणास उपलब्ध न झाल्याने खात्री करता आली नाही. तरी अशी साधार खात्री पटविण्यात यावी.

**3.928 शासन / अभिकरण / 13 वा वित्त आयोग / जिल्हा निधी / डी पी सी निधीतून केलेल्या बांधकामाच्या कामातील विविध शासकीय कपातीच्या रकमा संबंधित विभागाला विहित मुदतीत न भरल्याने झालेल्या अनियमिततेबाबत.**

**जिल्हा परिषद पुणे, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 8) -** वित्त विभागाचे सन 2014-15 या वर्षाचे लेखापरीक्षणात शासन/ अभिकरण / 13 वा वित्त आयोग/ जिल्हा निधी / डी पी सी निधीच्या दिनांक 31/3/2015 अखेरच्या बॅक ताळमेळ याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) देयकातून आयकर, विक्रीकर, स्वामित्वधन, कामगार विमा, उपकर, सुरक्षा अनामत आदींच्या रकमांची कपात केलेल्या रकमांचे धनादेश लेखा परिक्षण कालावधीपर्यत बॅकेत वटलेले नाहीत. तसेच प्रत्येक महिन्यात उपरोक्त प्रमाणे आयकर, विक्रीकर, स्वामित्वधन, कामगार विमा, उपकर, सुरक्षा अनामत यांची रक्कम देयकातून कपात करण्यात येते. परंतु सदरचे कपाती नियमानुसार एक आठवडयाच्या आत भरणा करणे आवश्यक असताना त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात आलेली नाही. म्हणजेच सदरची रक्कम संबंधीत लेखाशिर्षाखाली जमा केलेली नाही.

आयकर अधिनियम 1961 च्या कलम 194 (ज) अनुसार ज्या महिन्यामध्ये आयकराची कपात करण्यात आली आहे त्या महिन्यापासुन एक आठवडयाच्या आत सदर कपात रक्कम भरणा करणे आवश्यक असताना सदर धनादेश लेखा परिक्षण कालावधी पर्यत बॅकेत वटलेले नाही.

2) मुंबई विक्रीकर अधिनियम 1959 च्या कलम 40 नुसार ज्या महिन्यामध्ये विक्रीकराची रक्कम कपात करण्यात आलेली आहे. त्या महिन्याच्या पुढील 21 तारखे पर्यत सदर कपात रक्कम भरणा करणे आवश्यक असतांना सदर धनादेश लेखा परिक्षण कालावधी पर्यत बॅकेत वटलेले नाही.

3) बांधकाम कामाच्या विम्याची रक्कम बांधकाम सुरु होणेपूर्वी सदरची रक्कम भरणा करणे आवश्यक असताना सदर धनादेश लेखा परिक्षण कालावधी पर्यत बॅकेत वटलेले नाही.

4) महाराष्ट्र शासन, महसुल व वनविभाग, मुंबई-32 अधिसुचना क्रमांक दिनांक 11/02/2010 अन्वये बांधकामावर वापरल्या जाणा-या गौणखनिज स्वामित्व धनाची रक्कम शासन खाती भरणा करणे आवश्यक असताना सदर धनादेश लेखा परिक्षण कालावधी पर्यत बॅकेत वटलेले नाही.

5) बांधकामातून सुरक्षा अनामत पोटी कपात करण्यात आलेली रक्कम वित्त विभागाने जिल्हा निधीत भरणा केली नाही.

6) शासन निर्णय, उदयोग ऊर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्रमांक बीसीए 2209/ प्र.क्र.108/कामगार-7/अ,दिनांक 17/06/2010 अन्वये बांधकामाच्या विकास कामातून कामगार कल्याण उपकर रक्कमेचे धनादेश लेखा परिक्षण कालावधी पर्यत बॅकेत वठलेले नाही.

7) तसेच मोठया प्रमाणात दिलेले धनादेश अचूक न काढल्याने परत आलेले दिसून येतात उदा. आयएफसी नंबर, खाते नंबर चूकीचा नमूद करणे,नावामध्ये चूक आदी कारणांमूळे धनादेश परत येतात. याबाबत अचूक माहीतीचे धनादेश पारित करणे आवश्यक असताना याप्रमाणे कार्यवाही केली जात नाही.

8) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 नियम 31 नुसार धनादेश दिल्याच्या तारखे नंतर (3 महिने) पेक्षा अधिक काळ चालू राहणार नाही तो कालावधी संपल्यानंतर मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांच्या सहीने धनादेश विधीग्राहय करुन रोखवहीतील मुळ नोंदीसमोर पुन्हा विधीग्राहय केल्याची नोंद घेणे तसेच नियम 31 (2) एक वर्षावरील धनादेश रद्द करणे व आवश्यकतेनुसार नवीन धनादेश देणेची कार्यवाही करणे आवश्यक असतानां जिल्हा परिषदेच्या लेखा विभागाने अशा प्रकारे नियमाप्रमाणे कार्यवाही केलेली दिसून येत नाही.

9) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 नियम 27 नुसार पैसे घेणा-यास त्वरीत देणे आवश्यक असल्याशिवाय किंवा पैसे त्वरीत भरण्याकरीता आवश्यक असल्याशिवाय कोणत्याही धनादेशावर सही केली जाणार नाही असे असतांना धनादेश 1 वर्षापेक्षा जास्त कालावधी साठी पडून राहीले आहेत.

10) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 नियम 57 अन्वये विविध लोकसभा व राज्य सभा खासदार निधीचे बॅक ताळमेळ घेण्यात आले आहे. मात्र बॅक ताळमेळ घेतला त्याठिकाणी मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद, पुणे यांची स्वाक्षरी नाही.

**3.929 रोजकिर्दीत नियमबाहय जमा / खर्च नोंदलेबाबत.**

**जिल्हा परिषद सातारा, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 9) -** वित्त विभाग जिल्हा परिषद सातारा अंतर्गत जिल्हा परिषद मुद्रणालयाची सन 2014-15 ची रोजकिर्द पडताळणी करण्यात आली. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) दिनांक 31/03/2015 रोजी रोजकिर्दीच्या जमा बाजूस रुपये 16,77,147/- समायोजनाने जमा व खर्च बाजूस रक्कम रुपये 16,77,147/- आगाऊ बिलापोटी जमा रकमेचे समायोजन जिल्हाधिकारी सातारा अशी नोंद आहे.

सदर व्यवहाराचे देयक तयार न करता रक्कम मोघमपणे विना मंजूरीने नोंदवून संशयास्पद व्यवहार केले आहेत.

**3.930 तसलमात नोंदवही व थकीत तसलमात रक्कमेबाबत.**

**जिल्हा परिषद सांगली, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 9) -** तसलमात नोंदवही बाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) तसलमात नोंदवहीची तपासणी केली असता रक्कम रुपये 1,01,50,154/- रकमेचे समायोजन करण्यात आलेले नाही. ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक झेडपीए 2009/प्र.क्र.522/वित्त 09, दिनांक 10/12/2010 नुसार ज्या आर्थिक वर्षातील तसलमात असेल त्याच आर्थिक वर्षात वसुल करणे अथवा वेतनातून वसुल करणे आवश्यक असता तशी कार्यवाही केलेली नाही.

2) खाते प्रमुख तसलमात नोंदवही व विवरण पत्र यामध्ये तफावत दिसून येते तरी त्याबाबत योग्य तो ताळमेळ घेण्यात यावा.

**3.931 तेरावा वित्त आयोग निधीतून ई-पंचायत प्रकल्प अंतर्गत पुरवठा केलेल्या मनुष्यबळ करिता अदा रकमेबाबत.**

**जिल्हा परिषद कोल्हापूर, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 4) -** वित्त विभागाने पंचायत राज संस्थांच्या कार्यान्वयनासाठी आवश्यक असणाऱ्या मुलभूत सुविधा संगणकाच्या माध्यमातून देणे शक्य व्हावे करिता ईप्रकल्प अंतर्गत महाऑनलाईन लि. कंपनीशी झालेल्या त्रिपक्षीय करारनुसार कंपनीने जिल्हा परिषद, पंचायत समित्या व ग्रामपंचायती करिता पुरवठा केलेल्या मनुष्यबळ करिता मोबदला रक्कम रुपये 7,64,45,017/- कंपनीस अदा केली आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) सन 2014-15 मध्ये खाली नमूद केल्याप्रमाणे एक वर्षावरील थकीत मागणी रक्कम रुपये 24,92,449/- अदा केली असून त्यास जिल्हा परिषद लेखासंहिता नियम 44(1) प्रमाणे स्थायी समितीची मंजुरी घेण्यात आलेली नाही.

2) गटविकास अधिकारी यांनी ग्रामपंचायत व पंचायत समिती स्तरावर कंपनीने पुरवठा केलेल्या मनुष्यबळ बाबत जिल्हा परिषद वित्त विभाग यांना सादर केलेल्या मासिक उपस्थिती अहवाला प्रमाणे माहे नोव्हेंबर व डिसेंबर 2014 मध्ये कंपनीने पुरवलेल्या डेटा एन्टरी ऑपरेटर यांनी काम बंद आंदोलन केल्याने आवश्यक तेवढा मनुष्यबळ पुरवठा केलेला नाही अथवा याकरिता पर्यायी व्यवस्था केली नाही परिणामी सदर प्रकल्पा अंतर्गत नागरिकांना मिळणाऱ्या सुविधा पासून वंचित राहावे लागले तसेच त्याचा प्रकल्पाच्या कामकाजावर विपरीत परिणाम झाला त्यामुळे कंपनीवर दंडात्मक कार्यवाही केली नाही.

3) शासन व महाऑनलाईन कंपनी मध्ये ई-प्रकल्प बाबत झालेल्या कराराची प्रत लेखापरीक्षणास उपलब्ध झालेली नाही. त्यामुळे करारातील अटीचे पालन झाले असल्याची तपासणी करता आली नाही.

4) कंत्राटी कामगार(नियमन व निर्मुलन) अधिनियम 1970 प्रमाणे कंपनीमार्फत पुरवठा केलेल्या कामगारांना महाऑनलाईन कंपनीकडून नियमित व विहित दिनांकास व योग्य वेतन/मोबदला दिला जात असल्याबाबत जिल्हा परिषद विभागाने खात्री करणे आवश्यक आहे. तथापि अशी कार्यवाही झाली नाही.

5) आयकर अधिनियम 1961 मधील कलम 94J प्रमाणे तांत्रिक सेवा पुरवठा केल्यास पुरवठादार यांना देय रकमेतून 10 टक्के इतका TDS वसूल करून शासनास भरणा करणे आवश्यक असताना तो 2 टक्के इतका वसूल केल्याने रक्कम रुपये 5946013/- कंपनीकडून वसूल करून शासन भरणा करणे आवश्यक आहे.

**3.932 खासदार निधी बचत खात्यावर उपार्जित व्याज रकमेबाबत.**

**जिल्हा परिषद कोल्हापूर, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 21) -** जिल्हा परिषद वित्त विभागास खासदार स्थानिक क्षेत्र विकास कार्यक्रम अंतर्गत शासनाकडून प्राप्त निधीची तपासणी केली असता याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

खासदार स्थानिक क्षेत्र विकास कार्यक्रम अंतर्गत शासनाकडून प्राप्त निधीच्या बचत खात्यावरील व्याज रक्कम रुपये 6,29,097/- शिल्लक असून सदर रकमा शासनास वेळीच परत न केल्याने त्या नाहक अडकून पडलेल्या आहेत.

**3.933 वाहन लिलावाची रक्कम उशीराने शासनखाती भरणा केल्याबाबत.**

**जिल्हा परिषद सोलापूर, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 3) -** तपासणी सन 2014-2015 मध्ये जिल्हा परिषद उपकर निधी रोखवहीची तपासणी केले असतां माहे नोव्हेंबर 2014 मध्ये रुपये 26,98,250/- इतकी वाहन लिलावापोटी शासनाकडे भरणा केले आहे. याबाबत तपासणी केली असतां सदर वाहनांची लिलाव होऊन त्याची रक्कम 26,98,250/- माहे जुलै 2013 मध्ये रोखवहीस जमा आहे. लिलावाची रक्कम त्वरीत शासनखाती जमा करणे आवश्यक असतांना 15 महिन्यानंतर उशीराने शासनखाती जमा केले आहे. त्यामुळे या रकमेवरील व्याजांस शासनास मुकावे लागले आहे. रुपये 26,98,250/- इतक्या रकमेचे दसादशे 8 टक्के दराने 15 महिन्याचे रुपये 2,69,825/- व्याजाचे नुकसान झाले आहे. सदर व्याजाची रक्कम संबंधितांकडून वसुल कां करण्यात येवू नये याबाबत समर्पक खुलासा करावा.

**3.934 जास्त दराने व्याज देणारे सेंट्रल बँक ऑफ इंडीया मध्ये शासकीय निधीतील अखर्चित रक्कम रुपये 60 कोटी गुंतवणुक न करता को.ऑप.बँकेत रकमा गुंतवणूक करुन मिळणारे व्याज रकमेचे नुकसान करणेबाबत. (शासकीय निधी)**

**जिल्हा परिषद अमरावती, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 2) -** सन 2014-2015 मध्ये जिल्हा परिषद अमरावती द्वारा रुपये 60 कोटी गुंतवणूक करण्यात आली. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) गुंतवणूक नस्तीप्रमाणे सेंट्रल बँक ऑफ इंडिया 91 दिवसासाठी 8.25 टक्के व्याजदर देत असतांना जिल्हा परिषदेने शासकीय अनुदानातून अखर्चित असलेले रुपये 60 कोटी 7.25 टक्के व्याज देणाऱ्या को-ऑप बँकेत गुंतवणूक केल्याने मिळणाऱ्या व्याजाचे नुकसान झाले आहे.

2) ग्रामविकास व जलसंधारण विभाग शासन निर्णय क्रमांक जिपनी-2009/प्र.क्र.5019/वित्तं-3/ दिनांक 10 जुन 2009 अन्वये योजनेच्या निधीचा तात्काळ विनियोग होणार नसल्यास काही रकमा तात्पुरत्या स्वरुपात जिल्हा मध्यवर्ती बँक किंवा जिल्हा परिषदेचे आर्थिक व्यवहार चालत असलेल्या बँकेत गुंतवता येतात. 13 व्या वित्त आयोगाचे व्यवहार सेंट्रल बँकेमार्फत चालतात आणि सदरची बँक जादा दराने व्याज देत असतांना त्याचा विचार केला नसल्याने जिल्हा परिषदेचे व्याजाचे नुकसान झाले आहे.

3) शिल्लक रकमेचा ताळमेळ घेवून सदर रकमा तातडीने शासनखाती भरणे आवश्यक असतांना तशी कार्यवाही करण्यात आली नाही.

4) योजनेचा निधी तात्काळ उपयोगात आणणे आवश्यक असतांना मोठया प्रमाणात निधी अखर्चित असल्याचे दिसून येते.

5) मुंबई वित्तीय नियम 1959 मधील नियम 57 नुसार निधीची तात्काळ आवश्यकता असल्याशिवाय निधी कोषागारातून आहरीत करता येत नाही. या बाबीचे पालन केल्याचे दिसून येत नाही.

**3.935 दिर्घकाळ विविध निधीची अखर्चित रक्कम जिल्हा परिषद/पंचायत समिती स्तरावर ठेवल्याने झालेल्या व्याजेच्या नुकसानी बाबत. (शासकीय निधी)**

**जिल्हा परिषद अमरावती, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 7) -** जिल्हा परिषदे अंतर्गत 14 पंचायत समिती स्तरावर रक्कम रुपये 1,32,16,28,392/- एवढा अखर्चित निधी पडून असल्याचे दिसून आले. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) शासन निर्णय ग्रामविकास व जलसंधारण विभाग क्रं.जिपनि/2009/प्र.क्र.5019/वित्तं-3/ दिनांक 10/06/2009 मधील उपपरिच्छेद 2 नुसार विविध योजनांची अखर्चित रक्कंम तात्पुरत्या स्वरुपात अल्प गुंतवणूक करण्यात आलेली नाही.

2) शिल्लक रक्कमेच्या गुंतवणुकीवरील व्याजाचा (अल्प मुदत) विनियोग हा महाराष्ट्रं जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम 1961 नुसार जिल्हा यादीमध्ये अंतर्भुत नमुद बाबीवर केला नाही.

3) पंचायत समितीने अशी शिल्लक रक्कम प्रदिर्घ कालावधीपासून ठेवून घेतल्याने व्याजाचे नुकसान झालेले आहे.

4) सदरचा निधी शासन खाती जमा करुन अनुपालन दर्शवावे.

**3.936 प्रलंबित अग्रीम रक्कम रुपये 1,29,85,131/- बाबत. (स्वनिधी)**

**जिल्हा परिषद अमरावती, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 12) -** जिल्हा परिषद अमरावती अंतर्गत 31 मार्च 2015 अखेर रक्कम रुपये 1,29,85,131/- अग्रिम थकीत असल्याचे दिसून आले. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 212 अन्वये व शासन निर्णय ग्रामविकास विभाग क्रंमांक प्रपत्र/1089/झेडपी/870/337, दिनांक 31/12/1990 नुसार अग्रिम तीन महिन्याच्या आत वसुल करावयाचे निर्देश असतांना तशी कार्यवाही केलेली नाही.

2) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 220 अन्वये प्रलंबित अग्रिमाचे विवरण सहसंचालक,स्थानिक निधी लेखापरीक्षा, अमरावती यांना दरवर्षी 15 मे पर्यंत सादर करणे आवश्यंक असतांना तशी कार्यवाही झालेली नाही.

3) अग्रिमाचे समायोजन न झाल्याने जिल्हा परिषद निधी गुंतून पडलेला आहे याबाबत पडताळणी करुन गैरव्यवहार होत नसल्याची खात्री करावी.

4) शासन निर्णय वित्त विभाग क्रमांक अग्रिम-1095/प्र.क्र.70/95/विनिमय, दिनांक 26/09/1997 तसेच शासन निर्णय दिनांक 06/11/1990 अन्वये अग्रिम वसुलीची कार्यवाही करण्यात यावी.

**3.937 सन 2014-15 मध्ये जिल्हा परिषदेस शासनाकडून प्राप्त निधीतून कमी जास्त खर्च करणेबाबत.**

**जिल्हा परिषद वाशिम, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 3) -** वित्त विभाग, जिल्हा परिषद, वाशिम यांना आर्थिक वर्ष 2014-15 मध्ये मंजूर तरतुदीपेक्षा कमी/जास्त खर्च करण्यात आलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) वित्तीय वर्ष 2014-15 करीता जिल्हा परिषद, वाशिम अंतर्गत विविध विभागाकरीता विभागनिहाय खर्चाकरीता रुपये 348,92,35,416/- प्राप्त झालेल्या तरतुदीतुन सन 2014-15 या वित्तीय वर्षात रुपये 372,36,04,187/- एवढा खर्च झालेला आहे. विभागनिहाय प्राप्त तरतूद व झालेला खर्च ही बाब लक्षात घेता जिल्हा परिषदेने विभागनिहाय खर्चाचे योग्य नियोजन केलेले दिसून येत नाही. जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 39 मधील परिशिष्ट 4 भाग 2 अन्वये अंदाजपत्रकामध्ये तरतूद केलेल्या रकमेपेक्षा जादा खर्च करु नये असे वित्तीय औचित्यामध्ये नियमानुसार असतांना देखील त्याचे पालन झालेले नाही.

2) वित्त विभाग शासन निर्णय क्रमांक संकीर्ण-1002/प्र.क्र.128/अर्थोपाय, दिनांक 06/06/2008 अन्वये आर्थिक वर्षाचे आधी मुक्त केलेल्या व पुढील एका आर्थिक वर्षापेक्षा जास्त कालावधीसाठी अखर्चीत राहिलेला निधी

स्वायत्त संस्थांनी शासनाकडे परत करणे बंधनकारक आहे. परंतु लेखापरीक्षण पथकाचे अर्धशासकीय पत्र देऊन सुध्दा वर्षनिहाय अखर्चीत राहिलेला निधी बाबत माहिती उपलब्ध करुन देण्यात आला नाही.

3) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 244 नुसार विभागाने अनुदान व खर्चाची नोंदवही नमुना 90 मध्ये ठेवलेली आहे. परंतु सदर नोंदवहीत अखर्चीत निधीच्या रक्कमा शासनखाती जमा करुन परत केल्याबाबतच्या नोंदी घेतलेल्या नाहीत.

4) वित्त विभागाचे सन 2014-15 अखेर शासन खाती भरणा करावयाची अखर्चीत रक्कम रुपये 1,03,65,306/- एवढी असुन सदर रकमेमध्ये सन 2013-14 व त्यापुर्वीच्या अखर्चीत रकमेचा समावेश आहे. वर्षनिहाय अखर्चीत राहिलेला निधी विभागाने वर्षनिहाय उपलब्ध करुन न दिल्यामुळे सन 2013-14 च्या अखर्चीत निधी किती आहे. हे कळू शकले नाही.

**3.938 अखर्चीत रक्कम रुपये 26,36,00,000/- शासनखाती जमा न करणेबाबत.**

**जिल्हा परिषद यवतमाळ, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 6) -** याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, वित्त विभाग 10.2/प्र.क्र.128, दिनांक 06/06/2008 अन्वये आर्थिक वर्षात अखर्चीत निधी शासनास परत करणे बंधककारक आहे. असे असतांना विवरणपत्रामध्ये दर्शविल्याप्रमाणे 11 विभागाकडील रक्कम रुपये 26,36,00,000/- अखर्चीत रक्कम शासनखाती जमा करुन पुर्तता दर्शवावी.

2) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग, 77/वित्त 2, दिनांक 09/01/2013 नुसार विविध योजनेचा रक्कमा त्याच आर्थिक वर्षात खर्च न झाल्यास विभाग प्रमुखांनी 10 एप्रिल नंतर 15 जूलै च्या आत अनुदान निर्धारण करावययाचे आहे. व पंचायत समिती स्तरावरील अखर्चीत रकमा शासनखाती भरणा करण्याची कार्यवाही करावी.

**3.939 रोखनोंदवहीतील 31/03/2015 च्या शिल्लक रक्कमेतील तफावतीबाबत.**

**जिल्हा परिषद यवतमाळ, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 19) -** याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) जिल्हा निधी, अभिकरण निधी, सेस फंड, देखभाल दुरुस्ती, खासदार निधी, 13 वा वित्त आयोग निधीच्या 31/03/2015 ची शिल्लक निश्चित करतांना प्रत्येक निधीच्या गोषवा-यात बँकेचा फरक दाखविण्यात आला आहे. ताळमेळ घेवून अनुपालन दर्शवावे.

2) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखांसंहिता, 1968 मधील नियम 67(2) अन्वये स्थानिक निधी लेखापरीक्षा विभागाला शिल्लक कळविण्यात आली नाही.

3) 13 वित्त आयोगाचा रकमेत 2013 पासुन रक्कम रुपये 80,06,774/- रुपये रक्कमेचा फरक असून ताळमेळ घेण्यात आला नाही.

**3.940 मुद्रणालय शाखेमधील डुप्लीकेटर मशीनवर छपाईकरिता कागद व इतर साहित्य RISO खरेदीतील अनियमितता.**

**जिल्हा परिषद वर्धा**, **सन 2014-2015** (**परिच्छेद क्रमांक 2) -** वित्त विभागातील कागद व इतर साहित्य खरेदीतील अनियमिततेबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

प्रमाणक क्र. 34 दिनांक- 07/02/2015 रक्कम रुपये 5,95,050/-

1) मुद्रणालय शाखेतील कागद व इतर साहित्य खरेदीकरीता तीन ई-निविदा देण्यात आल्या आहेत, परंतु तिस-यांदा ई-निविदा कोणत्या वृत्तपत्रात प्रकाशित झाली आहे. त्यासंबंधी कोणतेही अभिलेखे लेखापरीक्षणास सादर केले नाहीत. अभिलेख्याची अर्धसमास पत्राद्वारे मागणी करुनही अभिलेखे सादर केले नाहीत.

2) कॉपीप्रो टेक्नॉलाजिक्स, नागपूर यांना पुरवठा आदेश देण्याआधी रुपये 100/- च्या स्टॅम्प पेपरवर करारनामा करणे आवश्यक असतांना त्याप्रमाणे कार्यवाही केली नाही.

3) पुरवठा आदेश दिनांक 10/10/2014 ला दिलेला असुन पुरवठा आदेशातील अटी व शर्ती प्रमाणे 07 दिवसाच्या आत पुरवठा करणे बंधनकारक असतांना प्रत्यक्षात पुरवठा दिनांक 29/12/2014 रोजी करण्यात आला. प्रपत्र- 2 मधील अटी व शर्ती अन्वये प्रती दिवस रुपये 20/- प्रमाणे विलंब शुल्क आकारण्यासंबंधी आदेशित करण्यात आलेले आहे, त्याप्रमाणे 80 दिवस पुरवठा उशीरा प्राप्त झाला आहे 80 X 20 = 1,600/- रुपये वसुल होणे आवश्यक आहे.

4) भारतीय कर कायदामधील 1961 कलम 194 सी अन्वये 2 टक्के आयकर आणि त्यावर अधिभार कपात केल्याचे अभिलेखे सादर करण्यात आलेले नाही,

5) नमूना-33 साठा पुस्तक अर्धसमास पत्र क्रमांक 12 दिनांक 12/07/2016 अन्वये मागणी करुनही लेखापरीक्षणास सादर करण्यात आलेले नाही, तसेच पुरवठादाराचे Sale Tax Clerance Certificate व मध्यवर्ती भांडार खरेदी संघटनेकडे नोंदणी केल्याचे प्रमाणपत्र इत्यादी अभिलेखे सादर केले नाही.

**3.941 6 महीन्याचे वरील धनादेश अरोखीकृत असतांना त्याबाबत जमा न घेता रक्कमा लेख्याबाहेर ठेवणेबाबत.**

**जिल्हा परिषद गोंदिया, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 3) -** सन 2014 - 2015 या वित्तीय वर्षात अभीकरण योजना रूपये 3,780/- हस्तांतरण योजना रूपये 8,98,246/- व जिल्हानिधी रूपये 2,94,185/- याप्रमाणे एकूण रुपये 11,96,211/- इतकी रक्कम 6 महीन्याचे वर अरोखीकृत धनादेश असल्याचे दिसून आले. सदर रकमा लेख्याबाहेर ठेवणेबाबत अनुपालन होणे आवश्यक आहे.

**3.942 मुद्रणालयातील रक्कमा जमा न करणेबाबत.**

**जिल्हा परिषद चंद्रपूर, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 16) -** मुद्रणालयातील रक्कमाची तपासणी केली असता, याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

जिल्हा परिषद वित्त विभाग, चंद्रपुर यांचे स्वत:चे प्रेस व मुद्रणालय आहेत. येथुन स्टेशनरी व प्रिंटीग साहित्य पंचायत समिती व जिल्हा परिषदेच्या इतर विभागाला साहित्य किंमतीत पुरविली जाते. तेव्हा त्या साहित्याचे देयकास एक वर्ष होऊनसुध्दा पुरवठा केलेल्या साहित्याच्या रक्कम वसुल करण्यात आली नाही. तसेच वसुलीसाठी मुद्रणालयाने पाठपुरावा केलेला दिसत नाही.

**3.943 प्रलंबित प्रवास अग्रिमाबाबत.**

**जिल्हा परिषद गडचिरोली, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 6) -** प्रलंबित प्रवास अग्रिम रुपये 42,500**/-** बाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) जिल्हा परिषद गडचिरोली वित्त विभाग सन 2014-15 या वर्षाची अग्रिम नोंदवही व सादर केलेले विवरणपत्र तपासले असता, सन 2008-2009 पासुन ते सन 2014-2015 पर्यंत दिनांक 31 मार्च अखेर रुपये 42,500/- प्रवास अग्रिम प्रलंबित असल्याचे दिसुन आले.

2) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 210 (ब) नुसार अग्रिम साधारणता जिल्हा निधीतुन मंजूरी घेऊनच दिले जाते. तसेच अग्रिम त्याच वित्तीय वर्षात खर्च करुन समायोजित करण्यात यावे. असे नियम असतांना त्याप्रमाणे कार्यवाही न केल्यामुळे एकुण प्रवास अग्रिम रक्कम रुपये 42,500/- प्रलंबित असल्याचे दिसुन आले आहे. तरी प्रलंबित अग्रिमाच्या वसुलीकडे मुख्य लेखा तथा वित्त अधिकारी यांनी विशेष लक्ष देऊन सदर प्रलंबित अग्रिमाची त्वरित वसुली व समायोजना करणे आवश्यक आहे.

**3.944 सन 2014-15 या वित्तीय वर्षात अभिकरण शुल्क प्रलंबित असणेबाबत.**

**जिल्हा परिषद गडचिरोली, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 7) -** सन 2014-2015 या वित्तीय वर्षात अभिकरण शुल्क प्रलंबित आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) जिल्हा परिषद अंतर्गत शिक्षण विभाग, आरोग्य विभाग, कृषि विभागांतर्गत अभिकरण योजना म्हणुन रुपये 11,12,78,000/- एवढी तरतुद प्राप्त झालेली असुन 5 टक्के अभिकरण शुल्क म्हणुन विभागाने रुपये 55,63,900/- वसुल करुन जिल्हा निधीत जमा करणे आवश्यक होते.परंतु प्रत्यक्षात 4 टक्के रक्कम रुपये 15,67,720/- वसुल केले असुन रुपये 54,07,128/- एवढे अभिकरण शुल्क वसुल होणे प्रलंबित आहे. प्रलंबित अभिकरण शुल्क रुपये 54,07,128/- वसुल होणे शिल्लक आहे. त्यामुळे जिल्हा परिषदेच्या महसुलावर परिणाम झाल्याचे लेखापरिक्षणास आढळले.

2) अभिकरण शुल्क नोंदवही प्रमाणित केलेली नाही. आकडे पेन्सिलने लिहले आहेत. विभाग प्रमुखाची स्वाक्षरी नाही. नोंदवही अद्यावत ठेवलेली नाही.

**3.945 निवृत्ती वेतन प्रकरणातील अतिप्रदानातील वसुलीबाबत.**

**जिल्हा परिषद औरंगाबाद, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 4) -** याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

वित्त विभाग जिल्हा परिषद औरंगाबाद यांचेकडे अधिकारी/कर्मचारी सेवा निवृत्ती वेतन प्रकरणातील अतिप्रदान वसुली झाल्याची नोंदवही अदयावत नसल्यामुळे पडताळणी करता आली नाही. प्राप्त तपशिलावरून सन 2014-2015 अखेर अतिप्रदान झालेली रक्कम रुपये 19,74,037/- अद्याप वसूल झालेली नाही.

महाराष्ट्र जिल्हा परिषद व पचांयत समीती लेखा सहिंता 1968 चे परिशिष्ट 4 नियम 64 (1) व 64 (2) नुसार वित्त विभागाने प्राधिकृत करुन निर्गमित केलेल्या निवृत्तीवेतन प्रदान आदेशावर गट विकास अधिकारी पचायंत समीती व विविध विभागाकडुन निवृत्ती वेतनाचे प्रदान करण्यात येते. सदरची प्रमाणके मासिक लेख्यासोबत वित्त विभागात लेखा परिक्षण करुन निवृत्तीवेतन नोंदवही ए.पी.पी. 9 मध्ये नोंद घेऊन प्राधिकृत केल्याप्रमाणेच प्रदाने झाली असल्याची खात्री होणे आवश्यक आहे. गटविकास अधिकारी पंचायत समिती कन्नड, सिल्लोड व सोयगांव यांचे कडील प्रकरणात जादा अदाईचे वसुलीची खात्री त्यांचेकडील प्रकरणात शासकिय वसुली झाली असल्याची खात्री करता आली नाही.

**3.946 जिल्हा परिषद वित्त विभाग औरंगाबादच्या सन 2014-2015 च्या वार्षिक अंदाजपत्रकाबाबत.**

**जिल्हा परिषद औरंगाबाद, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 11) -** याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) जिल्हा परिषद वित्त विभाग, औरंगाबाद सन 2014-2015 चे सुधारीत वार्षिक अंदाजपत्रक तयार करताना फक्त स्वउत्पन्नातुन प्राप्त होणा-या रकमांचा व त्यातुन करावयाचा खर्चाच्या नियोजनास जिल्हा परिषद सभेची मान्यता घेतल्याची दिसुन आले.

2) जिल्हा परिषदेने अंदाजपत्रक तयार करताना महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अर्थसंकल्पीय (अंदाजपत्रक तरतुद) नियम 1966 व रिअप्रोप्रिएशन ऑफ फंड नियम 1971 मधील तरतुदीनुसार, तसेच महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम 1961 चे कलम 137 नुसार जमा खर्चाचे शासकीय अनुदानासह सर्व रकमेची अंदाजपत्रक तयार करुन जिल्हा परिषद सभेची मंजुरी घेणे आवश्यक आहे, अशी कार्यवाही केलेली नाही.

3) सन 2014-2015 मध्ये शासन अनुदानाचे अंदाजपत्रकास सभेची मान्यते अभावी आर्थिक वर्षात प्राप्त तरतुद खर्च करुन नियमबाहयता केली आहे.

**3.947 दिर्घकाळ विविध निधीची अखर्चीत रक्कम जिल्हा परिषद औरंगाबाद स्तरावर ठेवल्याने झालेल्या व्याजेच्या नुकसानीबाबत.**

**जिल्हा परिषद औरंगाबाद, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 12) -** जिल्हा परिषद ओरंगाबाद यांनी मोठ मोठया रकमा योग्य कालावधीसाठी गुतंवणूक न करता खात्यावर अनावश्यकरित्या ठेवून घेतल्यामुळे जिल्हा परिषद औरंगाबाद यांचे नुकसान झालेले आहे. जिल्हा परिषद औरंगाबाद यांचेकडे रक्कम रुपये 1,22,02,66,161/- दिनांक 31 मार्च 2015 अखेर पंचायत समिती स्तरावर शिल्लक असलेल्या योजना निहाय रक्कमेचा तपशिल दर्शविण्यात

आलेला आहे. यामध्ये जिल्हा परिषद औरंगाबाद उपकराची रककम वगळता पचांयत समितीकडे शिल्लक असल्याचे दिसुन येते. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) शासन निर्णय ग्रामविकास व जलसंधारण विभाग, क्रमांक जिपनि/2009/प्रक्र.5019/ वित्त-3, दिनांक 10/06/2009 मधील उप परिच्छेद 2 नुसार विविध योजनांना निधीच्या अल्प गुतंवणुकीव्दारे प्राप्त होणारी व्याजाची रक्कम हि जिल्हा परिषद औरंगाबाद उत्पन्नाची बाब समजण्यात येवुन जिल्हा परिषद औरंगाबाद उत्पन्नाच्या अर्थसंकल्पात 5 - व्याज (2) शिल्लक रक्कमेच्या गुंतवणुकीच्या वरील व्याज (अल्प मुदत) (अ) अल्पमुदतीत गुंतविलेल्या रककमेवरील व्याज या लेखाशिर्षाखाली जमा दाखवावे, त्या रक्कमांचा विनियोग हा महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम 1961 नुसार जिल्हा यादीमध्ये अंतर्भुत (पहिल्या अनुसुची) नमुद बाबीवर नमुद करण्यात यावा. अन्य कुठल्याही बाबीवर खर्च करु नये अशी तरतुद आहे. अशा प्रकरणी आवश्यक तो शिल्लक रकमेचा ताळमेळ घेवुन तातडीने कार्यवाही करणे बाबत सर्व संबंधित जबाबदार अधिकारी यांना सुचना देणे बाबत मुख्य कार्यकारी अधिकारी यांना निर्देशित केले आहे.

2) विकास कामे व विकास योजनेसाठी निधी खर्च केल्यानंतर शिल्लक राहिलेला निधी यांचा वेळोवेळी आढावा घेऊन अल्प मुदतीच्या ठेवीच्या स्वरुपात गुंतवणूक करण्याबाबत शासनाच्या सूचना आहेत. तथापि, जिल्हा परिषद औरंगाबाद यांनी प्रदीर्घ कालावधीपासून विविध योजनेचा अखर्चित निधी जिल्हा परिषद औरंगाबाद व अंतर्गत पंचायत समिती स्तरावर ठेवण्यात आला आहे. एकुण रक्कम रुपये 1,07,71,08,696/- निधी पंचायत समिती यांनी जिल्हा परिषद औरंगाबाद यांना वेळीच वर्ग केला असता तर जिल्हा परिषदेस भविष्य निर्वाह निधी व इतर व्याजावर अनुज्ञेय असलेले व्याज दराप्रमाणे व्याज मिळाले असते. व सदर व्याजाची रक्कम जिल्हा परिषद औरंगाबाद यांच्या विकास कामासाठी वापरता आली असती. तथापि, प्रदीर्घ कालापासून विविध योजनेची रक्कम पंचायत समिती स्तरावर अनावश्यकरित्या ठेऊन घेतल्यामुळे जिल्हा परिषद औरंगाबाद यांचे नुकसान झालेले आहे.

**3.948 अखर्चित रक्कमा शासन खाती भरणा न केलेबाबत.**

**जिल्हा परिषद जालना, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 6) -** याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन नियोजन विभाग निर्णय क्रमांक स्थानिक विकास कार्यक्रम/1092/ प्र.क्र.21/योजना-6,दिनांक 16/03/1992 नुसार जिल्हा परीषदेकडे वर्षा अखेरीस जादा निधी शिल्लक राहणार नाही. यांची दक्षता घेऊन आर्थिक् वर्ष संपल्यावर त्या आठवड्याच्या आत शासनास उर्वरीत निधी परत भरणे आवश्यक आहे. परंतु अशी कार्यवाही झालेली नाही. शासन निर्णय क्रमांक संकिर्ण 1002/प्र.क्र.128/अखर्चित,दिनांक 06/06/2008 अखर्चित् रकमा पुढील वर्षात् खर्च करता येतात. मात्र त्यासाठी वित्त विभागाने आपल्या स्तरावरील बाबनिहाय सर्व अखर्चित रक्कमांचे विवरणपत्र 31/03/2015 पर्यात पाठविणे बंधनकारक आहे.

2) सन 2013-14 वर्षातील योजनांचा सन 2014-15 अखेर झालेला खर्च वजा जाता अखर्चित रक्कम शासनाकडे दिनांक 16/03/1992 चे शासन निर्णय नुसार परत करणे आवश्यक आहे.

**3.949 रोखवहीतील शिल्लक रक्कमेचा बँक शिल्लक रक्कमेशी ताळमेळ न घेतल्याबाबत.**

**जिल्हा परिषद बीड, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 2) -** महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या लेखासंहिता 1968 नियम 57 नुसार नियम 63 मधील नमुन्यात निधीच्या शिल्लकांचा बँक शिल्लकेशी मेळ घालून तफावतीचे सत्वर निराकरण करण्यात येईल परंतु सन 2014-2015 मध्ये अशी कार्यवाही केलेली नाही. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) लेखासंहिता नियम 31 (2) नुसार संबंधीत महसूली शिर्षाखाली जमेस घेण्यात येईल, परंतु रोखवहीची तपासणी केली असता दिनांक 31/03/2015 रोजी एक वर्षावरील असंवितरीत धनादेश जिल्हा निधी रुपये 2,19,67,866/- अभिकरण निधी रुपये 1,19,90,8,532/- खासदार निधी रुपये 3,86,634/- ग्रामिण पाणी पुरवठा रुपये 1,05,67,674/- असल्याचे दिसुन आले.

2) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 57 नुसार तीन महिन्यापेक्षा अधिक काळ वटवण्यात न आलेले धनादेश मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांचे वैयक्तिक निदर्शनास आणण्यात येतील. नियम 31 (1) नुसार धनादेश दिल्यानंतर सहा महिन्यापेक्षा अधिक काळ धनादेश चालू राहणार नाही व त्यास धनादेश काढणा-या अधिका-याने दिनांकित स्वाक्षरी केल्याखेरीज तो मुळ दिनांकापासुन एक वर्षापर्यंत विधीग्राहय राहील. तद्नंतर तो रद्द झाल्याचे समजण्यात येईल. हा धनादेश नियम 31 (1) नुसार संबंधीत महसूल शिर्षाखाली जमेस घेण्यात येईल.

3) न वटलेले धनादेश पुढील महिन्यात अग्रेषित न करणे, कमी रक्कमेने अग्रेषित करणे मागील महिन्यातील न वटलेले धनादेश महिन्यात वटलेले नसल्या मुळे ते पुढील महिन्याच्या न वटलेल्या धनादेशाच्या यादीत घेणे आवश्यक आहे. परंतु अशी कार्यवाही केलेली नाही.

**3.950 जिल्हा निधीची रक्कम जिल्हा परिषद उपकर निधीत नियमबाहयपणे वर्ग करण्याबाबत.**

**जिल्हा परिषद बीड, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 10) -** वित्त विभाग, जिल्हा परिषद बीड यांनी नियमबाहयरित्या निधी एका निधीमधुन दुस-या निधी मध्ये वर्ग केला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) विभागाने धनादेश क्रमांक 424067 दिनांक 22/09/2014 अन्वये रक्कम रुपये 10.00 कोटी जिल्हा निधी मधुन जिल्हा परिषद उपकरामध्ये वर्ग केले आहेत. सदर बाब नियमबाह्य आहे.

2) महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या लेखासंहिता 1968, नियम 3, परिशिष्ट एक मधील नियम 2(3) नुसार मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांनी रक्कम वर्ग करणे नियमबाहय असल्याचे नमुद करुन तशी माहिती शासनास कळविणे आवश्यक असताना रक्कम वर्ग करण्याची शिफारस केली आहे.

3) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे परिशिष्ट-1 मधील नियम (2) नुसार मुख्य लेखा व वित्त अधिकारी हे वित्तीय सल्लागार या नात्याने सर्व प्रस्तावांच्या परिणामाबद्दल सल्ला देतील तसेच दायित्व पत्करल्यावर सर्व दायित्वावर लक्ष ठेवतील. विशेषत: शासनाकडुन प्राप्त झालेल्या अनुदानावर पत्करण्यात आलेल्या दायित्वाच्या संबंधात नियंत्रण ठेवतील. तथापि मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांनी रुपये 10.00 कोटी शासन निधी जिल्हा परिषद स्वनिधीमध्ये नियमबाहयरीत्या वर्ग करण्यास शिफारस केली आहे.

4) तसेच मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांनी स्वत:च वित्तीय औचित्याचा भंग करून सदरची नियमबाहय कृती केलेली आहे.

5) जिल्हा परिषदेने वर्ग केलेल्या रक्कमेचे व्याज शासन खाती भरणा करने आवश्यक आहे. महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या लेखासंहिता 1968 मधील तरतूदी नुसार सदरची रक्कम नमुना नंबर 85 मधील नमुन्यातील देयकान्वये आहरीत करणे आवश्यक असताना, नियमबाह्यरित्या नमुना नंबर 29 मधील आकस्मिक खर्चाच्या देयकावर आहरीत केले आहे.

6) जिल्हा परिषद उपकर निधीमध्ये रक्कम नसतांना ठेकेदारास प्रदान करावयाची रक्कम रुपये 1,84,80,515/- इतका खर्च केला आहे. तसेच रुपये 3,66,37,972/- शिल्लक असतांना रुपये 5,51,18,487/- इतका खर्च केला आहे, त्यामुळे रुपये 10.00 कोटी वर्ग करणे भाग पडले असे दिसते. ही बाब वित्तीय औचित्यांचे उल्लघंन करणारी आहे.

7) जिल्हा परिषद बीडचे जिल्हा निधी (रोखवही पृष्ठ् 44)तील (एसबीएच बँक खाते) रक्कम प्रमाणक क्रमांक 131 व धनादेश क्रमांक 424067 व्दारे दिनांक 15/09/2014 रोजी रुपये 10.00 कोटी जिल्हा परिषद उपकर निधीत मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे टिप्पणी वरील दिनांक 15/09/2014 चे मान्यतेने आकस्मिक खर्चाचे देयक नमुना नंबर 29 व्दारे (रोखवही पृष्ठ् 12) दिनांक 29/09/2014 रोजी अग्रिम स्वरुपात वर्ग केले आहे. परंतु सदर कृती नियमबाहय आहे.

**3.951 जिल्हा परिषद स्वनिधीच्या रुपये 15,98,45,629/- दायित्वाबाबत.**

**जिल्हा परिषद बीड, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 37) -** वित्त विभाग, जिल्हा परिषद बीड यांनी बांधकाम विभाग व लघुपाटबंधारे विभागाच्या कामावर अर्थसंकल्पात तरतुद न करता खर्च केल्याने दायित्वामध्ये वाढ झाली आहे. पुर्वीचे दायित्व 45,26,2000/- इतके असतांना नव्याने रुपये 15,98,45,639/- इतक्या दायित्वात वाढ केली आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) जिल्हा परिषदेने अर्थसंकल्पीय तरतुदींन्वये खर्च न करता बांधकाम, लघुपाटबंधारे विभागावर जादा खर्च करुन दायित्व निर्माण केलेले आहे, वित्त व्यवस्थेचा कोणताही सांगोपांग विचार न करता, बांधकामांची प्रकल्प हाती घेऊन नियमबाहयरित्या खर्च नोंदविलेला आहे. दायित्व परिपक्व होण्यापुर्वी त्याकरीता निधीचे नियत वाटप न करता मंजुर तरतुद रकमेपेक्षा जादा दायित्व निर्माण केले आहे. मागासवर्गीयांचे व महिला व बाल कल्याणार्थ अनिवार्य असलेला खर्च केलेला नाही. सुरक्षा अनामतीच्या परतावा योग्य रकमांचे समायोजन न करता अन्य बाबींवर खर्च नोंदवून दायित्व ओढवून घेतले आहे. जमीन महसूल, मुद्रांक शुल्क, जमीन समानीकरण अनुदानाच्या रकमा ग्रामपंचायतींना प्रदान न करता इतरत्र खर्च करुन दायित्व निर्माण केले आहे.

2) मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांनी लेखा व अर्थसंकल्पीय अंदाज आणि सर्वसाधारण वित्तीय खर्च याबाबत वित्तीय सल्ला देऊन सर्व दायित्वांवर लक्ष ठेवलेले नसून, लेखा विषयक बाबींचे कामकाज करणा-या सर्व पदांचा यथोचित वापर न करता नस्ती सरळ सरळ स्विकारल्याचे दिसुन येते.

3) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 100 नुसार तांत्रिक अधिकारी यांनी नमुना नंबर 42 मधील प्रकल्प नोंदवही तयार करुन महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम 1961 चे कलम 125 अन्वये सक्षम प्रशासकीय मान्येते पूर्वी अंदाजित खर्चाची निश्चीत माहिती करुन देऊन, त्याची निकड आणि उपयुक्तता, त्याची वित्त व्यवस्था करणेसाठी उपलब्ध साधने विचारात घेणे आवश्यक आहे. सदरील कार्यवाही झाली नाही.

4) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 106 नुसार पुर्विचे दायित्व सपंल्याखेरिज नविन दायित्व निर्माण करु नये असे असतांना नविन दायित्व निर्माण केले आहे, त्यामुळे लेखा संहितेतील परिशिष्ठ 1(2) प्रमाणे दायित्वावर नियंत्रण ठेवले नसल्याचे दिसुन येते.

**3.952 जिल्हा परिषदेने 13 वा वित्त आयोग रुपये 26,32,72,873/- दायित्वाबाबत.**

**जिल्हा परिषद बीड, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 38) -** वित्त विभाग, जिल्हा परिषद बीड यांनी पंचायत समिती ग्रामपंचायत स्तर रुपये 7,66,48,520/- व पंचायत समिती स्तर रुपये 18,66,24,353/- अशा एकूण रुपये 26,32,72,873/- तेराव्या वित्त आयोगाच्या निधी वितरीत न करता विभाग स्तरावर खर्च करुन दायित्व निर्माण केले आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांनी लेखा व अर्थसंकल्पीय अंदाज आणि सर्वसाधारण वित्तीय खर्च याबाबत वित्तीय सल्ला देऊन 13 व्या वित्त आयोगाचे दायित्वांवर लक्ष ठेवलेले नसून, लेखा विषयक बाबींचे कामकाज करणा-या सर्व पदांचा यथोचित वापर न करता संचीका सरळ (Direct) स्विकृत केल्या आहेत. खर्चाच्या मंजूरीची लेखापरीक्षण करतांना मार्गदर्शक तत्वांचे पालन न करता जिल्हा परिषदेच्या वित्तीय हित संबंधांकडे लक्ष न देता खर्चावर नियंत्रण ठेवण्यात आले नाही.

2) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, निर्णय क्रमांक तेविआ 2010/ प्र.क्र.22/वित्त-4, दिनांक 30/08/2010 मधील परिच्छेद अ नुसार त्रिस्तरसाठी अनुक्रमे जिल्हा परिषद, पंचायत समिती व ग्रामपंचायत स्तरावर 10:20:70 या प्रमाणात विहीत मुदतीत निधी खर्च केलेला नाही. पंचायत समिती स्तरावर रक्कम रुपये 36,16,37,751/- व ग्रामपंचायत स्तरावर रक्कम रुपये 131,79,45,127/- असे एकूण रुपये 167,95,82,878/- वितरीत करणे आवश्यक होते. तथापि जिल्हा परिषदेने पंचायत समितींना वित्त प्रेषणाद्वारे अनुक्रमे रुपये 28,49,89,231/- व रुपये 113,13,20,774/- असे एकूण रुपये 141,6310,005/- वितरीत केलेले आहे. जिल्हा परिषदेकडे रुपये 26,32,72,873/- वितरीत न करता इतरत्र खर्च करुन दायित्व निर्माण केले आहे.

3) ग्रामविकास व जलसंधारण विभाग, परिपत्रक क्रमांक तेविआ-20110 प्र.क्र.42/वित्त 4, 30/04/2011 मधील परिच्छेद क्रमांक 8 नुसार 13 वा वित्त आयोगाच्या प्राप्त व्याजाची रक्कम रुपये 2,80,84,751/- त्रिस्तरावर 10:20:70 या प्रमाणात वितरीत करावयाचे असतानाही, सर्व व्याजाची रक्कम नियमबाह्यरित्या जिल्हा परिषद स्तरावर खर्च करण्यात आली.

4) 13 वित्त आयोग निधीतून बांधकाम बाबतच्या प्रशासकीय मान्यतेच्या संचिका सन 2014-2015 च्या लेखापरिक्षणात अर्धसमास पत्र क्रमांक 5 दिनांक 16/08/2016 अन्वये मागणी करुनही लेखापरिक्षणास उपलब्ध झाल्या नाहीत. सन 2014-2015 मध्ये 13 वा वित्त आयोग प्राप्त तरतुद (लाखात रुपये 644.71), तसेच दिनांक 31/03/2015 अखेर झालेला खर्च रुपये 868.43(लाखात) जादा खर्च रुपये 223.72 (लाखात) नोंदविण्यात आला असल्याचे दिसुन येते. दिनांक 01/12/2014 ते 31/03/2015 या कालावधीत 13 वा वित्त आयोगातून रुपये 495.62 (लाखात) खर्च करण्यात आला आहे, परंतु प्रशासकीय आदेशाची संचिका लेखापरिक्षणास उपलब्ध झाली नाही.

5) 13 वा वित्त आयोगांतर्गत जिल्हा परिषद स्तरावरील रुपये 179.68 लक्ष ची 39 कामे कायमस्वरुपी रद्द केली आहेत, परंतु प्रशासकीय मान्यता संचिका उपलब्ध न झाल्यामुळे वित्त विभागाने प्रत्यक्षात किती दायित्व निर्माण केले याबाबतची खात्री करता आली नाही.

6) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 106 नुसार पुर्वीचे दायित्व सपंल्याखेरिज नविन दायित्व निर्माण करु नये असे असतांना नविन दायित्व निर्माण केले आहे, त्यामुळे लेखा संहितेतील परिशिष्ट 1(2) प्रमाणे दायित्वावर नियंत्रण ठेवले नसल्याचे दिसते.

**3.953 जिल्हा परिषदेने केलेल्या गुंतवणुकीबाबत.**

**जिल्हा परिषद परभणी, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 9) -** वित्त विभाग, जिल्हा परिषद, परभणीने सन 2014-15 मध्ये जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक परभणी येथे रुपये 40 कोटी 10 महिन्यासाठी व रुपये 15 कोटी 46 दिवसांसाठी अशी एकूण रुपये 55 कोटी गुंतवणुक केली आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) जिल्हा परिषदेने धनादेशाव्दारे रुपये 55 कोटी इतकी गुंतवणूक केली आहे. परंतु त्यांची गुंतवणूक नोंदवही नमुना नंबर 84 चे अवलोकन केले असता त्यात सदर गुंतवणुकीवर मिळणाऱ्या व्याजची परिगणना केली नसल्याचे दिसून आले आहे. त्यामुळे जिल्हा परिषदने जी गुंतवणुक केली त्यावर किती व्याज मिळाले व त्या व्याजाची नोंद जिल्हा परिषद उपकराच्या नमुना नंबर 7 रोख पुस्तिकेत जमा बाजूस घेतले बाबत पडताळणी करता आली नाही.

2) विभागाने सदर गुंतवणूक ही कुठल्याही प्रमाणकाशिवाय, केवळ एका कार्यालयीन आदेशाद्वारे धनादेश देऊन केली आहे. ही नियमबाह्य बाब आहे. विभागाने सदर गुंतवणुकीची रक्कम, गुंतवणुकीच्या दिनांकास नमुना नंबर 7 सामान्य रोख पुस्तकात खर्च खाती दर्शविली नाही. तसेच मार्चमध्ये मुदत ठेवींची मुदत संपल्यानंतर त्या ठेवी जमा बाजूसही दर्शविल्या नाहीत.

3) विभागाने 13 व्या वित्त आयोगाची 2 खाती काढली आहेत. त्यापैकी त्यांच्या महाराष्ट्र ग्रामीण बँक खात्यात त्यांनी वरील तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे दिनांक 12/02/2016 रोजी 46 दिवसांकरिता रुपये 2 कोटी एवढी रक्कम मुदती ठेवींच्या स्वरुपात गुंतविली आहे. परंतु फेब्रुवारी महिन्याच्या ताळमेळ पत्रकात त्यांनी या गुंतवणुकीचा कुठेच उल्लेख केलेला नाही. ही बाब महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 च्या नियम 57 मधील तरतुदींशी विसंगत आहे.

**3.954 गुंतवणुकीतील अनियमिततेबाबत.**

**जिल्हा परिषद हिंगोली, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 8) -** वित्त विभाग, जिल्हा परिषद हिंगोली यांनी सन 2014-15 मध्ये केलेल्या गुंतवणुकीबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) वित्त विभागाकडील गुंतवणुक नोंदवही नमुना नबंर 84 मध्ये ठेवण्यात आलेली आहे तथापि नोंदवहीमध्ये वर्षअखेरीस व्याजाची देय, वसुल झालेली व शिल्लक रक्कम दर्शविणारा गोषवारा काढण्यात आला नाही. तसेच लेखासंहिता 1968 चे नियम 224 अन्वये प्रत्येक सहा महिन्यानंतर येणा-या महिन्याच्या अखेरीपुर्वी मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांनी नोंदवहीतील बचतपत्रांची पडताळणी करुन सर्व बचतपत्रे नोंदवही प्रमाणे बरोबर असल्याचे प्रमाणित करण्यात आले नाही. नोंदवहीतील नोंदी प्रमाणित करण्यात आलेल्या नाहीत.

2) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक जिपनि/2009/प्र.क्र.50019/ वित्त, दिनांक 10/06/2009 अन्वये जिल्हा परीषदेने गुंतवणूक पैसे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक वा जिल्हा परीषदेचे व्यवहार ज्या बँकांमधून चालतात अशा बँकामध्ये ठेवण्याबाबत शासनाचे आदेश असताना विभागाने जिल्हा परिषदेचे व्यवहार नसलेल्या बँकेत गुंतवणुक केली आहे.

3) कक्ष अधिकारी, ग्रामविकास व जलसंधारण विभाग यांचे पत्र क्रमांक 2014/प्रक्र 26/वित्त-3,दिनांक 11/08/2014 नुसार मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी जिल्हा निधीची रक्कम सुरक्षित राहण्याच्या दृष्टीने संबंधित जिल्ह्याच्या जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या आर्थिक स्थितीबाबत वेळोवेळी आढावा घेण्याबाबत व योग्य वाटल्यास जिल्हा निधीचे खाते शासनाच्या कोषागाराचे व्यवहार ज्या राष्ट्रीयकृत बँकेत चालतात त्या बँकेत सुरु करण्याचा निर्णय घ्यावा असे आदेश असताना त्याप्रमाणे कार्यवाही झालेली नाही.

**3.955 बयाना रक्कमेचे डी.डी. जिल्हा निधी खाते जमा करणेबाबतचे अभिलेखे उपलब्ध न करणेबाबत.**

**जिल्हा परिषद हिंगोली, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 15) -** वित्त विभाग, जिल्हा परिषद हिंगोलीने सन 2014-15 च्या लेखापरीक्षणात बयाना रक्कमेच्या डी.डी. बाबत अभिलेखे लेखापरीक्षणास उपलब्ध केलेले नाहीत. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभागाचे परीपत्रक क्रमांक झेडपीए-2000/प्र.क्र.27/33, दिनांक 05/09/2000 नुसार भरलेल्या निविदा फॉर्मसोबत भरणा करावयाची बयाना रक्कम हि निविदा धारकाच्या सोईने कोणत्याही बँकेवरील धनाकर्षाव्दारे स्विकारण्यात यावी, सदराचा धनाकर्ष भरलेल्या निविदा फॉर्मसोबत कागदपत्राच्या लखोटयामधुन सादर करण्यास सांगण्यात यावे, सदराचा धनाकर्ष हा मुख्य लेखा व वित्त अधिकारी जिल्हा परिषद यांचे नावे काढून तो रेखांकीत करुन घेण्यास निविदा धारकाला सुचना दयाव्यात सदरचा धनाकर्ष प्राप्त झाल्यावर तो ताबडतोब जिल्हा परीषदेच्या जिल्हा निधीमध्ये बैंकेतील खात्यात जमा करण्यात यावा. तसेच निविदा मंजुरीची प्रक्रीया पुर्ण झाल्यावर ज्या निविदा धारकांची निविदा नामंजुर झालेली आहे. त्यास बयाना रक्कम त्वरीत धनादेशाव्दारे परत करण्यात यावी. याप्रमाणे कार्यवाही केले बाबतचे लेखे अर्धसमास पत्र क्र. 09 दिनांक 27/09/2016 अन्वये मागणी करुनही दर्शविलेले नाहीत.

**3.956 पोस्टातील अल्पबचत गुंतवणूकीबाबत.**

**जिल्हा परीषद नांदेड, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 16) -** याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) पोष्ट विभागाच्या अल्पबचत गुंतवणूक संदर्भात संचिका तपासली असता जिल्हा परिषदेचे रूपये 27,94,530/- अल्पबचत गुंतवणूक असल्याचे आढळून आले आहे.

2) जर हे पैसे पोष्टातून काढून इतरत्र गुंतविले असते तर त्यावर व्याज मिळून जिल्हा परिषदेचे उत्पन्न वाढले असते.

3) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 223 मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांच्या कडून कार्यवाही होणे आवश्यक होते अशी कार्यवाही करण्यात आलेली नाही.

**3.957 जिल्हा परिषदांकडे स्व निधीतून निर्माण केलेल्या पदाबाबत.**

**जिल्हा परिषद उस्मानाबाद, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 5) -** वित्त विभाग, जिल्हा परिषद, उस्मानाबादने जिल्हा परिषदेच्या स्वनिधीतून पद निर्माण केलेले आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) जिल्हा परिषद, उस्मानाबादने जिल्हा परिषद ठरावाद्वारे जिल्हा परिषदेच्या वित्त विभागात कनिष्ठ लेखाधिकारी पद निर्माण करण्यात आले असून या पदावर नेमण्यात आलेल्या कर्मचाऱ्यांचे वेतन व भत्ते यावरील खर्च जिल्हा परिषदेच्या उत्पन्नातून केला जातो. अशा कर्मचाऱ्यांवरील खर्च जरी जिल्हा परिषदेच्या निधीतून करण्यात येत असला तरी त्याचा “संवर्ग” स्वतंत्र ठेवण्यात आलेला नाही. असे कर्मचारी इतरत्र बदलले जातात किंवा इतर पदावर पदोन्नतीने नियुक्त केले जातात तसेच कालेलकर निवाड्याप्रमाणे सदर कर्मचाऱ्यांना भविष्य काळामध्ये नियमित आस्थापनेवर सामावून घेणे सक्तीचे ठरणार आहे. त्यामुळे अशा कर्मचाऱ्यांचा खर्च प्रथमत: जरी स्वनिधीतून होत असला तरी त्यांना नेहमीच्या आस्थापनेवर बदलून घेतल्या नंतर किंवा दुसऱ्या संवर्गात बदली अथवा पदोन्नतीने नियुक्ती झाल्यास अशा कर्मचाऱ्यांचे सेवा निवृत्ती वेतन व सेवा निवृत्तीचे इतर फायदे यावरील खर्चाचा बोजा शासनावर पडण्याची शक्यता आहे.

2) जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम 1961 चे कलम 243 मधिल तरतुदीनुसार कोणत्याही संवर्गातील कर्मचाऱ्यांची संख्या अथवा रचना पुरविण्याचा अधिकार शासनास आहे. अशा पदाच्या निर्मितीस शासनाच्या मंजूरीची आवश्यकता आहे.

3) महाराष्ट्र नागरी सेवा (पदग्रहण अवधी, स्वीयेत्तर सेवा आणि निलंबन, बडतर्फी व सेवेतून काढून टाकणे यांच्या काळातील प्रदाने) नियम, 1981 चे परिशिष्ट चार (नियम 44,45,48,59 व 65) अन्वये शासकीय कर्मचाऱ्यांच्या बाबतीत रजा वेतन, निवृत्ती वेतन अंशदानाच्या वसुलीचे विनियमन करणारे नियम विहीत केलेले आहेत.

4) जिल्हा परिषद उस्मानाबाद द्वारा स्वनिधीतून निर्माण केलेली वित्त विभागातील कनिष्ठ लेखाधिकारी पद आहे. वित्त विभागासाठी निर्माण पदांचे वेतनावरील खर्च जिल्हा परिषद स्वउत्पन्नातून जरी करत असली तरी सदरील कर्मचारी यांचे रजा वेतन व निवृत्ती वेतन अंशदान भरणा करण्यात येत नाही. वित्त विभागाअंतर्गत निर्माण पदावरील कर्मचारी यांची बदली / बढती तत्सम किंवा उच्च पदावर होत असल्याने रजा वेतन अंशदान व निवृत्ती वेतन अंशदान भरणा करणे आवश्यक ठरते. तथापि अशी कार्यवाही करण्यात आलेली नाही.

वित्त विभागाकडील जिल्हा परिषद द्वारा निर्मित कनिष्ठ लेखाधिकारी (वित्त विभाग) यांचे रजा वेतन व निवृत्ती वेतन अंशदान थकीत रक्कम व त्यावरील व्याज पदनिर्मिती ते आजतागायत शासन खाती भरणा करणे आवश्यक आहे.

**3.958 ठेव संलग्न विमा योजना अंतर्गत लाभ प्रदानाच्या प्रतिपुर्तीची रक्कम अप्राप्त असलेबाबत.**

**जिल्हा परिषद उस्मानाबाद, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 15) -** वित्त विभाग, जिल्हा परिषद उस्मानाबाद यांना ठेव संलग्न विमा योजना अंतर्गत लाभ प्रदानाच्या प्रतिपुर्तीची रक्कम रुपये 14,81,351/- अप्राप्त आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) ग्रामविकास विभाग, आदेश क्रमांक जीपीएफ-1087/सीआर-2823-17,दिनांक 01/06/1987 नुसार ठेव संलग्न विमा योजनेमध्ये करण्यात आलेल्या सुधारणा जिल्हा परिषदेमधील भविष्य निर्वाह निधीच्या वर्गणीदार कर्मचाऱ्यांसाठी लागू करण्यात आली आहे. ठेव संलग्न विमा योजना अंतर्गत दाव्याचा खर्च जिल्हा परिषदेने प्रथम स्वत:च्या उत्पन्नातून करावयाचा असून प्रतिपुर्तीची मागणी शासनाकडे करावयाची आहे.

जिल्हा परिषद उस्मानाबाद यांनी प्रतिपुर्तीची रक्कम रुपये 14,81,351/- शासनाकडून प्राप्त करून घेणे आवश्यक आहे.